स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



STUDENT WELFARE DEPARTMENT

Phone: (02462) 229525
Fax : (02462) 229572
Website: www.srtmun.ac.in
E-mail: dswsrtmunm@gmail.com

जा.क्र.वि.क/कौमी/ए.स./२०१५–१६/१०७६७–११९६५ दि. १८/११/२०१५

प्रति,
**मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**मा. संचालक, सर्व शै. संकुले,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : दि. १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०१५ कालावधीत "कौमी एकता सप्ताह " म्हणून साजरा करणे बाबत.**
**संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक:कौएस–२०१५/प्र.अ.१४८/का.८, दि. ०३/११/२०१५.**
**संदर्भ : जिल्हाधिकारी कार्या. परिपत्रक जा.क्र.२०१५/टे–४/कौएस/सीआर–३३, दि. १०/११/२०१५.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, वरील संदर्भीय शासन परिपत्रकानूसार व मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये सर्व संलग्नित महाविद्यालये तसेच सर्व शैक्षणिक संकूले प्रस्तुत विद्यापीठ यांनी दि. १९ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०१५ कालावधीत "कौमी एकता सप्ताह " म्हणून साजरा करावा असे, सुचविले आहे.

तरी सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकानूसार कार्यवाही करावी, ही विनंती.

स्वाक्षरीत/—
**डॉ.राजेश्वर दुडूकनाळे**
संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग.

श्री.अजय दर्शनकार,सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding "Kaumi Ekta Saptah". या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home page मधील New/Circular-School, Administration सदराअंतर्गत प्रसिध्दिस देण्यात यावे.

E:\backup-2012\sunilk\all correspondence

(13)

## जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड


वेब साईटः-www.Nanded.gov.in
दुरध्वनी क्रः-02462-235077
शाखाः-सामान्य शाखा

Email:-nandedrdc@gmail.com
Fax No:-02462-238500


जावक क्रं.2015/टे-4/कौएस/सिआर-33

" कौमी एकतासप्ताह " प्राधान्य

दिनांकः-~~09~~/11/2015 10


VICE-CHANCELLOR'S SECRETARIAT
S.R.T.M.U. Nanded-431606
Inward No. 6095
Dt.of Received 17/11/15
Time........Sign.


प्रति,

1) मा. कुलगुरु, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ विष्णुपुरी नांदेड.
2) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड.
3) मा.आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.
4) पोलीस अधिक्षक, नांदेड
5) मा.अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय नांदेड.
6) सह.आयुक्त, समाजकल्याण कार्यालय नांदेड.
7) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड.
8) प्रकल्प संचालक, महिला व बाल विकास विभाग, नांदेड
9) सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड.
10) शिक्षणाधिकारी, माध्यमिक/प्राथमिक, जिल्हा परिषद नांदेड.
11) समाज कल्याण अधिकारी.श्रेणी-1 जिल्हा परिषद नांदेड.

विषयः- दि. 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर या कालावधीत "कौमी एकता सप्ताह" म्हणून साजरा करणे बाबत.

संदर्भः- मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन अल्पसख्यांक विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक कौएस-2015/प्र.क्र148/का.8, दि. 03 नोव्हेंबर, 2015

उपरोक्त संदर्भीय विषयाकीत प्रकरणी दरवर्षा प्रमाणे दिनांक 19 ते 25 नोव्हेंबर, हा सप्ताह " **कौमी एकता सप्ताह** " म्हणून पाळण्यात येतो, त्याकरीता सोबत सलग्न करण्यात आलेल्या परिपत्रकानुसार दिनांक 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर, 2015 हा कालावधी "**कौमी एकता सप्ताह**" म्हणून साजरा करण्याबाबतच्या सुचना दिनांक 03/11/2015 च्या परिपत्रकानूसार कळविण्यात आले आहे. सदर परिपत्रक www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 201511031723086414 असा आहे.

तरी दिनांक 19 नोव्हेंबर ते 25 नोव्हेंबर 2015 हा कालावधी कौमि एकता सप्ताह, म्हणून साजरा करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांना आपल्यास्तरावरुन सुचना देण्यात याव्यात.

तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.आयोगास व या कार्यालयास अवगत करावे ही विनंती.

जिल्हाधिकारी नांदेड करीता.

प्रतिलिपीः- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

1. मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग,मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-32, यांना माहितीस्तव सादर.
2. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
3. महा प्रबंधक, दुरसंचार निगम नांदेड,
4. अधिक्षक, मुख्य डाक घाल कचेरी, नांदेड,
5. विभागीय रेल्वे व्यवस्थापक, विभाग नांदेड,
6. उपविभागीय अधिकारी,नांदेड/देगलूर/किनवट/भोकर/हदगांव/बिलोली/कंधार/धर्माबाद, यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
7. सर्व तहसीलदार, जिल्हा नांदेड/लोहा/कंधार/मुदखेड/अर्धापूर/भोकर/उमरी/हदगांव/ किनवट/माहूर/हिमायतनगर/देगलूर/बिलोली/धर्माबाद/नायगांव खैर./मुखेड यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
8. जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड, यांना माहितीस्तव व प्रसिध्दीस्तव.

स्वा/-
जिल्हाधिकारी नांदेड करीता.

DSW
1131

दि.१९.११.२०१५ ते दि.२५.११.२०१५ हा सप्ताह "कौमी एकता सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः कौएस - २०१५/प्र.क्र.१४८/का.८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३ नोव्हेंबर, २०१५

**शासन परिपत्रक**

केंद्र शासनाने सन १९८६ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार दि.१९ नोव्हेंबर, २०१५ ते दि.२५ नोव्हेंबर, २०१५ हा सप्ताह कौमी एकता सप्ताह म्हणून राज्यात साजरा करावयाचा असून त्यामध्ये आयोजित करावयाच्या पुढील कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घ्यावयाचे आहे. त्यानुसार यावर्षी गुरुवार दि.१९.११.२०१५ ते बुधवार दि.२५.११.२०१५ हा कालावधी कौमी एकता सप्ताह म्हणून पाळण्यात यावा व त्यातील जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घेऊन खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

१) **गुरुवार दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५** - राष्ट्रीय एकात्मता दिवस : धर्मनिरपेक्षता जातीयवादी विरोध व अहिंसा यांच्यावर भर देणारे सभा, चर्चासत्रे व परिसंवाद आयोजित करावेत.

२) **शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर, २०१५** - अल्पसख्याक कल्याण दिवस : अल्पसख्याकाच्या कल्याणासाठी १५ कलमी कार्यक्रमावर भर देण्यात यावा, जातीय दंगली उदभवणाऱ्या शहरातून बंधुभाव निर्मितीसाठी खास मिरवणूका काढण्यात याव्यात.

३) **शनिवार दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५** - भाषिक सुसंवाद दिवस : भारताच्या अन्य भागातील लोकांच्या भाषेचा वारसाचा परिचय करुन देण्याच्या दृष्टीने विशेष वाङमयीन कार्यक्रम व कवी संमेलने आयोजित करण्यात यावीत.

४) **रविवार दिनांक २२ नोव्हेंबर, २०१५** - दुर्बल घटक दिवस : २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत अनुसूचित जाती व जमाती मधील व्यक्ती व कमकुवत घटकातील व्यक्ती यांना मदत करण्यासाठी ठरवून दिलेले कार्यक्रम ठळकपणे निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने सभा व मेळावे भरविण्यात यावेत. त्यावेळी खालील गोष्टींवर भर देण्यात यावा.

अ) इंदिरा आवास योजना व घरासाठी जागांचे वाटप व कर्जाचे वाटप.

ब) अतिरिक्त जमिनीचे भूमिहीन मजुरांना वाटप.

क) गरीबांना कायदेविषयक सहाय्य देण्याचे कार्यक्रमही आयोजित करण्यात यावेत.

५) सोमवार दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ - सांस्कृतिक एकता दिवस : भारतीयांच्या विविधतेतील एकतेवर भर देणारे आणि सांस्कृतिक संरक्षण व एकात्मता संबंधाची भारतीय परंपरा सादर करणारे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

६) मंगळवार दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ -महिला दिन : भारतीय समाजातील महिलांचे महत्व व राष्ट्र उभारणीच्या विकासामधील त्यांची भूमिका यावर भर देण्यात यावा.

७) बुधवार दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ - जोपासना दिवस : पर्यावरणाची जोपासना व त्याची जाणीव यासाठीच्या वाढत्या गरजेवर भर देणारे मेळावे व कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

२. वरीलप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेखा लक्षात घेऊन माध्यमांचा उपयोग करावा.

१) ध्वजारोहण
२) मिरवणूका व सभा
३) राष्ट्रीय एकतेची शपथ
४) चर्चासंमेलने
५) चित्रपट दाखविणे व प्रदर्शने

यावर्षी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घ्यावयाची आहे. या शपथेचा नमुना सोबत जोडला आहे. राज्यातील सर्व केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या कार्यालयातून ही शपथ घेण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच भित्तीपत्रके, फलक यांच्यावर ठसठशीत असे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिकचिन्ह प्रदर्शित करावे.

३. शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत त्यांनी दि.१९ नोव्हेंबर, २०१५ ते दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ दरम्यान एक सभा शक्यतो सकाळी प्रार्थनेच्या तासानंतर आयोजित करावी. सभेच्या अध्यक्षपदी संस्थेच्या सोयीप्रमाणे प्राचार्य किंवा विशेष निमंत्रित असावेत. त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता व ऐक्यभाव यासंबंधी विद्यार्थ्यांना समजेल अशा स्वरुपात विवेचने करावीत. दिनांक १९ नोंव्हेंबर, २०१५ रोजी त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घ्यावी. कार्यक्रमाची सांगता समूह राष्ट्रगीताने करावी. शैक्षणिक संस्थांनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ ते दि.२५ नोव्हेंबर, २०१५ या सप्ताहात राष्ट्रीय एकात्मतेची विविध पैलू ठळणपणे निदर्शनास आणण्यासाठी एखादा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे.

४. स्वयंसेवी संस्थांनी करावयाचे कार्यक्रम त्यांच्या सोयीने करण्याची त्यांना मोकळीक आहे. मात्र खालीलपैकी एक तरी कार्यक्रम त्यांनी राष्ट्रीय एकात्मता सप्ताहात ठेवावे -

१) राष्ट्रीय एकात्मतेवर प्रख्यात पुढाऱ्यांची भाषणे
२) राष्ट्रीय एकात्मतेची शपथ सामूहिकरित्या घेणे.
३) सांस्कृतिक कार्यक्रम करणे
४) राष्ट्रगीताचे सामूहिक गायन

५. शासकीय कार्यालये व शासन अंगीकृत संस्था यांच्याबाबतीत दि.१९ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागप्रमुखानी सभा आयोजित करावी. सभेच्या अध्यक्षस्थानी महत्वाच्या सामाजिक व्यक्ती असाव्यात. भाषणानंतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची एकत्रित शपथ देण्यात यावी व कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक राष्ट्रगीत ठेवावे.

६. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने निरनिराळ्या माध्यमाव्दारे या कार्यक्रमांस प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच राष्ट्रीय एकात्मतेचे संदेश देणारे चित्रपट दाखविले जातील असे पहावे.

७. महिला व बालविकास विभाग तसेच सांस्कृतिक कार्य विभाग यांनी विविध ठिकाणी उचित कार्यक्रम आयोजित करुन पार पाडावेत.

८. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात सर्व संबंधितांची मदत घेऊन हा कार्यक्रम वरीलप्रमाणे त्यांच्या विविध माध्यमातून आखला जाईल व यशस्वी केला जाईल असे पहावे. तसेच केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११०३१७२३०८६४१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2015.11.04 12:41:41 +05'30'

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी

८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
१०.पोलिस महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य
११.सर्व पोलिस आयुक्त,
१२.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१३.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
१४.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
१५.मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापकीय संचालक/प्रशासकीय अधिकारी
१६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७.कक्ष अधिकारी, सा.प्र.वि./२९ (मंत्रालयात कार्यक्रम आयोजित करण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी)
१८. कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कक्ष, मंत्रालय, मुंबई (२ प्रती संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)
१९.निवड नस्ती (का-८).

## राष्ट्रीय एकात्मता शपथ

" मी गांभीर्यपूर्वक शपथ घेतो/ घेते की, देशाचे स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय एकात्मा अबाधित राखण्यासाठी व दृढ करण्यासाठी मी निष्ठापूर्वक काम करीन"
मी अशीही प्रतिज्ञा करतो/करते की, मी कधीही हिंसाचाराचा अवलंब करणार नाही. तसेच मी सर्व धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे किंवा इतर राजकीय वा आर्थिक गाऱ्हाणी शांततामय आणि सांविधानिक मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न चालू ठेवीन.

## राष्ट्रीय एकात्मता प्रतिज्ञा

"मै सत्यनिष्ठा से प्रतिज्ञा करता हुं की देश आझादी तथा एकता बनाये रखने और उसे मजबूत रखने के लिए समर्पित होकर कार्य करुंगा"
"मै यह भी प्रतिज्ञा करता हूॅ की कभी हिंसा का सहारा नही लूंगा तथा धर्म, भाषा, क्षेत्र से संबंधित भेदभाव और झगडो और अन्य राजनैतिक या आर्थिक शिकायतो का निपटारा शांतीपूर्ण तथा संवैधानिक तरीको से करने के लिए प्रयास करता रहूंगा"

## National Integration Pledge

"I solemnly pledge to work with dedication to preserve and strengthen the freedom and integrity of the nation."
"I further affirm that I shall never resort to violence and that I will continue to endeavor towards settlement of all difference and disputes relating to religion, language, region or other political or economic grievances by peaceful and constitutional means. "I